जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

जाहिरात क्रमांक २००९/आरबी- डेस्क-१/आस्था/१/कावि-११९१ दिनांक २१.११.२००९

# लिपीक-नि-टंकलेखक /तलाठी/वाहन चालक/शिपाई पद भरती २००९-१०

जिल्हाधिकारी बीड यांचे आस्थापने वरील खालील पदांसाठी खाली नमुद केलेल्या प्रवर्गातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१) लिपीक -नि- टंकलेखक संवर्गात रिक्त पदांचे आरक्षण (वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९००)**

| अ.क्रं. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षणानुसार भरावयाची रिक्त पदे | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अंशकालीन पदविधर / पदविका धारक १०% | प्रकल्प ग्रस्त ५% | भुकंप ग्रस्त २% | खेळाडु ५% | इतर | अपंग अनुशेष |
| १ | अनु.जाती | १४ | ४ | २ | १ | १ | - | १ | ५ | अंध अथवा अल्प दृष्टी २ पदे व श्रवणशक्तीतील दोष १ पद |
| २ | अनु.जमाती | ७ | २ | १ | १ | - | - | - | ३ | |
| ३ | वि.जा.अ | २ | - | - | - | - | - | - | २ | |
| ४ | भ.ज.(ब) | ३ | १ | - | - | - | - | - | २ | |
| ५ | भ.ज.(क) | ३ | १ | - | - | - | - | - | २ | |
| ६ | भ.ज.(ड) | - | - | - | - | - | - | - | - | |
| ७ | वि.मा.प्र. | - | - | - | - | - | - | - | - | |
| ८ | इ.मा.व. | ११ | ३ | २ | १ | १ | - | १ | ३ | |
| ९ | सर्वसाधारण | २२ | ७ | ३ | २ | १ | - | १ | - | |
| | **एकूण** | ६२ | १८ | ८ | ५ | ३ | - | ३ | १७ | |

**शैक्षणिक अर्हता :-लिपीक-नि-टंकलेखक (वर्ग-३) पदासाठी**

अ) एस.एस.सी. (शालांत प्रमाणपत्र परीक्षा) उत्तीर्ण.

ब) टंकलेखनः- टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

क) शासन सेवेत नियुक्ती नंतर संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**२) तलाठी संवर्गातील रिक्त पदांचे आरक्षण (वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० ग्रेड पे २४००)**

| अ.क्रं. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षणानुसार भरावयाची रिक्त पदे | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अंशकालीन पदविधर / पदविकाधारक १०% | प्रकल्पग्रस्त ५% | भुकंपग्रस्त २% | खेळाडु ५% | इतर | अपंग अनुशेष |
| १ | अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | - | अंध अथवा अल्प दृष्टी १ पदे व श्रवणशक्तीतील दोष १ पद |
| २ | अनु.जमाती | ७ | २ | १ | १ | - | - | - | ३ | |
| ३ | वि.जा.अ | १ | - | - | - | - | - | - | १ | |
| ४ | भ.ज.(ब) | १ | - | - | - | - | - | - | १ | |
| ५ | भ.ज.(क) | १ | - | - | - | - | - | - | १ | |
| ६ | भ.ज.(ड) | - | - | - | - | - | - | - | - | |
| ७ | वि.मा.प्र. | - | - | - | - | - | - | - | - | |
| ८ | इ.मा.व. | ७ | २ | १ | १ | - | - | - | ३ | |
| ९ | यर्वसाधरण | ६० | १८ | ९ | ६ | ३ | १ | ३ | - | |
| | **एकूण** | ७७ | २२ | ११ | ८ | ३ | १ | ३ | ९ | |

**शैक्षणिक अर्हता :-तलाठी (वर्ग-३)पदासाठी**

अ) एस.एस.सी. (शालांत प्रमाणपत्र परीक्षा) उत्तीर्ण.

ब) शासन सेवेत नियुक्ती नंतर संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे

### ३) वाहन चालक संवर्गात रिक्त पदांचे आरक्षण (वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९००)

| अनु.जमाती | इमाव | एकूण |
|---|---|---|
| १ | १ | २ |

**शैक्षणिक अर्हता :-वाहनचालक (वर्ग-३) पदासाठी** किमान इयत्ता चौथी परिक्षा उत्तीर्ण व स्वतःचा हलके मोटार वाहन चालवण्याचा वैद्य परवाना असावा.

### ४) शिपाई संवर्गातील रिक्त पदांचे आरक्षण (वेतनश्रेणी रु. ४४४०-७४४० ग्रेड पे १३००)

| अ.क्रं. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षणानुसार भरावयाची रिक्त पदे | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भुकंपग्रस्त २% | खेळाडु ५% | इतर | अपंग अनुशेष |
| १ | अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | |
| २ | अनु.जमाती | ३ | १ | - | - | - | - | २ | |
| ३ | वि.जा.अ | ३ | १ | - | - | - | - | २ | |
| ४ | भ.ज.(ब) | - | - | - | - | - | - | - | |
| ५ | भ.ज.(क) | - | - | - | - | - | - | - | |
| ६ | भ.ज.(ड) | - | - | - | - | - | - | - | |
| ७ | वि.मा.प्र. | १ | - | - | - | - | - | १ | |
| ८ | इ.मा.व. | १ | - | - | - | - | - | १ | |
| ९ | सर्वसाधरण | १९ | ६ | ३ | १ | - | १ | ८ | |
| | **एकूण** | २७ | ८ | ३ | १ | - | १ | १४ | |

**शैक्षणिक अर्हता :शिपाई (वर्ग-४) पदासाठी** किमान इयत्ता चौथी परिक्षा उत्तीर्ण व लिहीता वाचता येणे आवश्यक आहे

### ५) टिप :-

१) नियुक्ती देण्याच्या पदसंख्येत व आरक्षणात बदल करण्याचे पुर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीत यांचेकडे राखीव आहेत.

२) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं. असक/१०२५/प्रक्र. २१/भाग-दि.२४/०१/२००६ अन्वये शासनाने विभागीय स्तरावर निर्माण केलेले अतिरीक्त संवर्ग कक्षाकडे उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या प्रमाणे पदे कमी होण्याची शक्यता आहे.

३) महिला व बालकल्याण विभागाचे शासन निर्णय क्रं. ८२ /२००१/अशेआ-२०००/प्रक्र ४१५/का-२ दि.२५/०५/२००१ मधील तरतुदी नुसार महिलांचे आरक्षण दर्शाविण्यात आलेले आहे.

४) समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागु राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजीक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येणार नाही.

५) ३० टक्के महिला आरक्षणासाठी महिला उमेदवार न मिळाल्यास त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधुन पदे भरण्यात येतील.

### ६) वयोमर्यादा :-

१. उमेदवाराचे वय दिनांक २१/११/२००९ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयासाठी ५ वर्षाची शिथीलता)

२. माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

३. खेळाडु उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथील.

४. अंशकालीन उमेदवारासाठी ३ वर्ष अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहील.

५. १९९१ चे जनगणना कर्मचारी / स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य उमेदवारांकरिता शासन निर्णयातील तरतुदीनुसार वयाची अट राहील.

६. अपंग उमेदवारासाठी शासकीय निर्णयानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

७. प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारासाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

**७) इतर अटी व शर्ती**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा तथापी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं. मकसी-१००७/प्रक्रं.३६/का/३६ दि १० जुलै २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या ८६५ गावातील १५ वर्षापासून रहिवाशी असल्याचा त्यांच्या वास्तव्यांचा सक्षम प्राधिका-यांचा विहीत नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

२. उक्त पदांसाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणा-या संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

३. मागासवर्गीय उमेदवारांनी नजीकचे कालावधीतील सक्षम अधिकारी (उपल्हिाधिकारी दर्जाचे अधिकारी ) यांनी दिलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड होणा-या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कडून जात वैधता प्रमाणपत्र, विहीत मुदतीत सादर केल्या नंतरच नियुक्ती दिली जाईल.

४. अनुसुचित जाती /अनुसुचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांसाठी सन २००८-२००९ या वर्षाचे उत्पन्न व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी . नॉन क्रिमीलीअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसुचित जमातीच्या आणि खुला प्रवर्ग व्यतिरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

५. शासन वित्त विभाग निर्णय क्रं अनियो /१०/०५/१२६/सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि. १ नोंव्हेबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म. ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४)आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

६. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन परिपत्रक दि १/७/२००५ नुसार माहाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रतिज्ञपत्र देणे आवश्यक आहे.

७. उमेदवारांना उक्त पदांसाठी आवश्यक अर्हतेनुसार शैक्षणीक प्रमाणपत्रे, विहीत वेग मर्यादेचे टंकलेखन प्रमाणपत्र व संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र इत्यादींच्या साक्षांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात मूळ प्रती जोडू नयेत.

८. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडावी.

९. जाहिरातीत नमूद केलेल्या पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारांना जसजशी पदे रिक्त होतील त्या प्रमाणे ऑक्टोंबर २०१० पर्यंत नियुक्त्या देण्यात येतील.

१०. शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

११. अतिरिक्त संवर्ग कक्ष विभागीय आयुक्त औरंगाबाद कडुन अतिरिक्त कर्मचारी मिळण्याची शक्यता आहे तसे झाल्यास जाहिराती मध्ये नमूद पद संख्या कमी होण्याची शक्यता आहे. त्यानुसार पदांच्या उपलब्धते प्रमाणे पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१२. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा,निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतीम निर्णय इत्यादी बाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती/नियुक्ती अधिकारी यांनी राखुन ठेवलले आहते.

१३. या कार्यालयाच्या लिपीक -नि - टंकलेखक व शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता दि.१.१२.२००७ रोजी वर्तमान पत्रातुन जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती सदर भरती प्रक्रिया न्यायालयीन प्रक्रियेमुळे पूर्ण होवू शकलेली नाही. त्या जाहिरातीच्या अनुषंगाने ज्या उमेदवारांनी त्यांचे आवेदनपत्र या कार्यालयास सादर केलेले आहेत त्या अर्जाचा विचार या जाहिरातीमधील रिक्त पदे भरताना, रिक्त पदाच्या उपलब्धते प्रमाणे करण्यात येणार आहे.

१४. दि.१.१२.२००७ च्या जाहिराती संदर्भाने प्राप्त आवेदनपत्राची छाननी करण्यात आलेली असून पात्र / अपात्र आवेदन पत्रांच्या यादया जिल्हाधिकारी बीड कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामधील पात्र उमेदवारांनी पुनश्च अर्ज करण्याची आवश्यक्ता नाही. मात्र अपात्र उमेदवार सर्व कागदपत्रांच्या व इतर अटिंची पुर्तता करुन पुन्हा अर्ज दाखल करु शकतील.

१५. सदर जाहिरात, अर्जाचा नमुना, व पात्र /अपात्र उमेदवारांच्या यादया जिल्हयाच्या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध आहेत. त्याचा पत्ता http://www.beed.nic.inअसा आहे.

**८) खेळाडु उमेदवाराकरिता**

१. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रं. रा.क्री.घो. २००२/प्र.क्र.६८/क्री.यु.से.२ दिनांक ३० एप्रील २००५ नुसार पात्र खेळाडू उमेदवार.

२. खेळाडूसाठी आरक्षणाच्या पदाकरिता ज्या खेळाडूंनी राज्य अजिंक्यपद स्पर्धा मध्ये भाग घेतला आहे. आणि उक्त शासन निर्णयामध्ये नमूद केलेनुसार पारितोषीके प्राप्त केलेली आहेत. अशा उमेदवारांनी शासन निर्णयानुसार अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्र नमुना १ ते ४ मध्ये साक्षांकित प्रत जोडावी व असे मूळ प्रमाणपत्र अंतिम निवडीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. प्रमाणपत्र संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून पडताळणी झालेनंतरच नियुक्ती देण्यात येईल.

३. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडु सदस्यांना खेळाडूसाठी असलेले ५ टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.तसेच मागासवर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे ५ % आरक्षण अनुज्ञय राहणार नाही.

४. इतर मागासवर्ग, भ.ज.(क.ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या खेळाडु सदस्यांनी खेळाडूंसाठीच्या ५ टक्के आरक्षणासाठी क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याचे मूळ प्रमाणपत्र अंतिम निवडीच्या वेळी सादर करणे अवश्यक राहील.

**९) महिला उमेदवाराकरिता**

१. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूबांतील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३०टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग वि.जा.अ. भ.ज.ब.क.ड. या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

२. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग विजाअ, भज (ब क ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या ३० टक्के आरक्षणासाठी क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी व मूळ प्रमाणपत्र अंतिम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०) माजी सैनिक उमेदवारांसाठी**

१. शा.सा.प्र. विभाग परिपत्रक दि. १०/१०/८० व दि. १६/४/८१ नुसार माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरिता पात्र उमेदवार असावा.

**११) शुल्क (फी)**

१. उमेदवाराने अर्जासोबत खालील प्रमाणे परीक्षा शुल्क स्वरुपात शुल्क (फी) राष्ट्रीयकृत बँकेचा क्रॉस धनाकर्ष (डिमांड ड्रॉफ्ट) जोडणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही स्वरुपात शुल्क (फी) स्वीकारली जाणार नाही. डी.डी. (डिमांड ड्रॉफ्ट) जिल्हधिकारी बीड यांच्या नावे असणे आवश्यक राहील, डी.डी. (डिमांड ड्रॉफ्ट) जिल्हाधिकारी बीड या नावाने नसेल तर अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

| | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| १. लेखी परीक्षा (लिपीक पदांसाठी) | रू. १५०/- | रु. ७५/- |
| २. लेखी परीक्षा व मुलाखत (तलाठी , शिपाई व वाहन चालक पदासाठी) | रु. २००/- | रु.१००/- |

३.माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु राहणार नाही.

**१२) निवड पध्दती**

१. शासन सा.प्र.विभाग निर्णय क्रं. प्रनि.म. २००७/प्र.क्र.४६/०७/१३/अ दि.१९.१०.२००७ मधील तरतुदीनुसार लिपीक वर्गीय पदासाठी उमेदवाराची निवड करताना मुलाखती न घेता फक्त २०० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल.

२. तलाठी पदासाठी निवड करताना २०० गुणाची लेखी परिक्षा व २५ गुणाची तोंडी परिक्षा (मुलाखत) धेऊन उमेदवाराची निवड करण्यात येईल.

३. सदर पदासाठी लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकि ५० गुण ठेवुण एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.सदरील लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल.

४. लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

५. वरील सर्व पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणाच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

६. उमेदवारास समान गुण मिळाल्यास परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा अमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्यप्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २७ जून २००८ मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.

## १३) <u>अर्ज कसा करावा</u>

१. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात ३० से.मी. x २० से.मी. आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला हस्तलिखित / टंकलेखीत वा चक्रमुद्रित करुन अर्ज करावा. उमेदवाराची अर्जातील माहिती / तपशील सुस्पष्ट नमूद करावा अर्जासोबत स्वतःचे नांव व पत्ता नमूद केलेला २४ से.मी. x ११ से.मी. आकाराचा रुपये ५/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

२. उमेदवाराने ओळखपत्रावरील छायाचित्राच्या आकाराचे त्याचे अलिकडचे छायाचित्र आवेदपत्रावर विहित जागी स्वसाक्षांकित करुन घट्ट चिकटवावे.

३. शैक्षणिक अर्हता / टंकलेखन / संगणक अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात.

४. उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) चे तत्व अनुसुचीत जाती / अनुसुचीत जमाती व्यतीरिक्त इतर सर्व मागासवर्गाला लागू असल्याने उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २००८-०९ या वर्षातील नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी तसेच जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी

५. समांतर आरक्षणातील उमेदवाराने (माजी सैनिक / खेळाडु / अपंग / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त/ पदवीधर अंशकालीन ) उमेदवार यांनी समांतर आरक्षणाबाबतच्या संबंधित प्रमाणपत्राची छायाप्रत अर्जासोबत जोडावी.

६. **अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख व कार्यालयाचा पत्ताः-** उमेदवाराने संपूर्ण भरलेला आपला अर्ज, शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रतीसह विहीत नमुन्यात भरुन सदस्य सचीव तथा निवासी उपजिल्हाधीकारी, जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या पत्यावर दि. ११/१२/२००९ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत) पोहोचतील, अशा बेताने समक्ष अथवा पोष्टाने पाठवावेत. विहित मुदतिनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच या संबंधाने उमेदवारासमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. टपालाने विलंबाने , प्राप्त झालेली लिफाफे उघडण्यात येणार नाहीत.

७. अर्जाच्या पाकीटावर ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव व सामाजिक (मागासवर्ग) आरक्षणानुसार प्रवर्ग नमूद करावा.

८. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, विहित शुल्काचे डिमांड ड्रॉफ्ट (डी.डी.) नसलेले अर्ज, विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकिचे भरलेले अर्ज, फोटो नसलेला व फोटो स्वसाक्षांकीत न केलेला अर्ज, विहित टंकलेखन प्रमाणपत्र,वय, शैक्षणिक अर्हता,जातीचा दाखला, नॉनक्रिमिलीअरचे प्रमाणपत्र साक्षांकीत प्रत न जोडलेले अर्ज विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज, लहान कुटूंबाचे शपथपत्र न जोडलेला अर्ज अशा प्रकारचे अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९. छाननी मध्ये अपात्र ठरवण्यात आलेल्या अर्जदारांना त्यांनी अर्जासोबत भरलेले शुल्क परत मिळणार नाहीत.

१०. या जाहिरातीला अनुसरून ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील, केवळ अशाच उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील, अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

११. छाननी अंती पात्र / अपात्र झालेल्या अर्जाच्या याद्या दिनांक ३१/१२/२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येतील, लेखी परिक्षांसाठी स्थळ, वेळ प्रवेशपत्राव्दारे U.P.C.ने लेखी कळविण्याात येईल, मात्र पोष्टांच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२. वर नमुद सर्व पदासाठी लेखी परिक्षा शासन परिपत्रक दि.१२ऑगस्ट २००८ नुसार संपूर्ण राज्यभर एकाच दिवशी व एकाच वेळी घेण्यात येईल ही बाब विचारात घेवून उमेदवारांनी वर नमुद रिक्त पदांसाठी अर्ज करावेत.

१३. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतिम निर्णय व काही प्रशासकीय अथवा तांत्रीक अडचण उदभवल्यास निवड स्थगित किंवा रद्य करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.

१४. उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

१५. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली, म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे, असे नाही.

१६. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

१७. लेखी परिक्षा व मुलाखतीसाठी येण्या जाण्याचा खर्च स्वतः करावा लागेल.

१८. सदर जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हयाच्या संकेत स्थळावर (वेबसाईट) वर उपलब्ध आहे. त्याचा पत्ता :- http://www.beed.nic.inअसा आहे.

दिनांक .२१/११/२००९<br>
स्थळ :- बीड

**अध्यक्ष,**<br>
**जिल्हा निवड समिती तथा**<br>
**जिल्हाधिकारी बीड**

# <u>अर्जाचा नमुना</u>

**(लिपीक-नि-टंकलेखक / तलाठी / वाहन चालक/ शिपाई / या पदासाठी )**

**पदाचे नांव -----------------------प्रवर्ग------------------**

उमेदवाराचा अलिकडच्या काळातील स्वसाक्षांकीत केलेला ओळखपत्राच्या आकाराचा फोटो.

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रंमाक :-** [ ]

प्रति,

मा. सदस्य सचिव,
तथा, निवासी उप जिल्हाधिकारी,
निवड समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय,बीड

**विषय:-लिपीक-नि-टंकलेखक/तलाठी/वाहन चालक /शिपाई पदासाठी अर्ज**

आपल्या कार्यालयाची जाहीरात क्रमांक २००९/आरबी-डेस्क-१/आस्था/१/कावि-११९१ दिनांक २१/११/२००९ ला अनुसरून ---------------- (पदाचे नांव लिहावे ) या पदासाठी अर्ज करीत असुन,माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) अर्जदाराचे संपुर्ण नांव (मराठी मध्ये )आडनांव :---------------------------------------------

स्वत:चे नांव: -----------------------------------------

वडिलाचे/पतीचे नांव-------------------------------------

२) पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता:- ------------------------------------------------------------

घर क्रमांक----------------गाव/शहर---------------पोष्ट . -----------

.तालुका ------------ जिल्हां . -------- पीन कोडं . ---------------------

दुरध्वनी क्र. -------------------मोबाईल क्र.------------------

३) जन्म दिनांक : [ | ] दिनांक [ | ] महिना [ | | | ] वर्ष

४) जन्म दिनांक अक्षरी --------------------------------------

५)दिनांक २१ /११ /२००९ रोजी वय दिवस [ ] महिने [ ] वर्ष [ ]

६)राष्ट्रीयत्व: --------------------------------------

७) उमेदवार पुरूष अथवा स्त्री :- योग्य चौकोनात अशी खुण करावी

| पुरूष | स्त्री |
|---|---|
| | |

८) उमेदवार विवाहीत आहे की अविवाहीत: ------------------------

९) अर्जदाराची जात -----------------------

१०)जातीचा प्रवर्ग:-खालील चौकोनात अशी खुण करावी(मागास वर्गीय उमेदवांराला मेरीटनुसार खुल्या प्रवर्गात पात्र ठरविता येते त्यामुळे मागास वर्गीय उमेदवाराने त्यांचा प्रवर्गच नमुद करावा)

| अ.जाती | अ.जमाती. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

११)समांतर आरक्षणाचा प्रकार: योग्य रखान्यात अशी खूण करा (सोबत प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी )

| महिला | माजी सैनि क | अंशकालीन पदवीधर / पदविकाधारक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडु | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**टिप**:१.माजी सैनिक म्हणजे स्वतः उमेदवार माजी सैनिक असावा, त्यांचे नातेवाईकाला माजी सैनिक आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

२. खेळाडू म्हणजे राष्ट्रीय/राज्य स्तरावर खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघीक क्रिडा स्पर्धा मध्ये प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडूअसावा. खेळाडूच्या आरक्षणा संदर्भात शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दि.३० एप्रील २००५वाचावा.

१२)अ. जातीचे प्रमाणपत्र देणा-या अधिका-याचा हुद्या, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक:-

-----------------------------------------------------------------------------------------------------

ब.उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्या बाबतचे प्रमाणपत्र देणा-या प्राधिका-याचा हुद्या व प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक

-----------------------------------------------------------------------------------------------------

१३) **(अ)अर्जदाराची शैक्षणिक पात्रता**

| **अ.क्र.** | **शैक्षणिक पात्रता** | **संस्थेचे नांव/बोर्ड/विद्यापीठ** | **उत्तीर्ण वर्ष** | **एकूण गुण** | **प्राप्त गुण** | **गुणाची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | | | | | | |
| **२** | | | | | | |
| **३** | | | | | | |
| **४** | | | | | | |

**१३)(ब) टंकलेखन व संगणक अर्हता तपशिल व इतर गुणवत्ता**

| **अ.क्र.** | **टंकलेखन विषय (भाषा)** | **श.प्र.मि.** | **उत्तीर्ण वर्ष** | **संस्थेचे नांव** | **संगणकिय अर्हता** | **उत्तीर्ण वर्ष** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | | | | | | |
| **२** | | | | | | |
| **३** | | | | | | |
| **४** | | | | | | |

१४) अनुभव असल्यास अनुभवाचा कालावधी व कार्यालयाचे नांव :---------------------------------------------------

१५) सेवायोजन कार्यालय नोंदणी क्रमांक व दिनांक (जिल्हयासह ):---------------------------------------------------

१६) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय्? होय/नाही

१७) अर्जदार महराष्ट्र-कर्नाटक सिमावर्ती भागातील ८६५ गावातील रहिवासी आहे काय? होय/नाही
(असल्यास १५ वर्षाचे वास्तव्याचा सक्षम अधिका-याचा विहीत नमुन्यातील दाखला जोडावा)
१८) अर्जदार स्वातंत्र सैनिकाचा पाल्य आहे काय? (नामनिदर्शनपत्राची साक्षंकीत प्रत जोडावी) होय/नाही

१९) अर्जदार पदवीधर अंशकालीन कर्मचारी आहे काय? (पुराव्याची साक्षांकीत प्रत जोडावीा) होय/नाही

२०) अर्जदार १९९१ चे जनगणना कर्मचारी आहे काय ? (असल्यास साक्षंकीत प्रत जोडावी) होय/नाही

२१) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय? होय/नाही

२२)डी.डी.बाबत तपशिल रक्कम रूपये -----------------------डी.डी.क्रमांक--------------------- दिनांक------------------

मी या व्दारे प्रमाणित करतो/करते की, माझ्या माहितीनुसार वरील तपशिल सत्य आणि अचुक आहे.या माहितीतील कोणताही तपशील चूकीचा / खोटा आढळल्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल व माझेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

**दिनांकः-**
**ठिकाणः-** **उमेदवाराची स्वाक्षरी व नांव**

प्रतिज्ञापत्र
नमुना-अ
(नियम ४ पहा )

मी श्री/श्रीमती/कुमारी---------------------------------------------------------------------------------------------------
श्री--------------------------------------------यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय-------वर्ष--------राहणार--------------------
--- या व्दारे पूढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,
१.मी---------------------------------या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.
२.आज रोजी मला ---------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत.त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या------------------आहे (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा).
३.हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

दिनांकः-
उमेदवाराची स्वाक्षरी व नांव
ठिकाणः-

---

**कार्यालयीन वापरासाठी**

अर्ज क्रमांक व दिनांक :- दिनांक :- / /२००९